GoodLuck Page No.
Date

# 1] राष्ट्रवाद

## प्रस्ताविका :-

18 व्या शतकाच्या बरोबर मध्यंतरापासून म्हणजे 1750 पासूनच्या भारताच्या इतिहासाच्या अभ्यासाला आपण सुरवात केली असून त्याला आधुनिक भारत म्हटले आहे. त्याला ब्रिटिश कालखंड असेही म्हणता येईल. प्रथम आपण या देशात ब्रिटिशांची सत्ता कसकशी स्थिरावत आणि विस्तारत गेली ते अभ्यासले. एक प्रकारे हा राजकीय बदल आधुनिकतेची सुरवात ठरली. देशभर आणि सर्व क्षेत्रांत त्याचे हळूहळू परिणाम दिसू लागले. शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिकदृष्ट्या बदलांचे वारे वाहू लागले. अनेक सुधारकांनी आणि संस्थांनी त्यासाठी मोलाचे कार्य केले आणि हळूहळू आधुनिक भारत आकार व रूप घेऊ लागला. या बदलाला राजकीय परिणामही अटळ होता, अर्थात त्या राजकीय परिणामांची गती सौम्य होती आणि प्रत्यक्ष मूर्त स्वरूपाने त्याची अनुकूलता दिसण्यास शंभर ते सव्वाशे वर्षांचा कालखंड जावा लागला. अर्थात, या प्रदीर्घ काळात त्या राजकीय बदलांची पार्श्वभूमी प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे तयार होत होती. हिंदी राष्ट्रवादाचा उदय होत गेला आणि 19 व्या शतकाच्या शेवटी भारतीय राष्ट्रसभेच्या म्हणजे काँग्रेसच्या रूपाने तो परिणाम प्रकट झाला. या प्रकरणामध्ये आपण हिंदी राष्ट्रवादाचा उदय त्याची कारणे, राष्ट्रसभेची स्थापना आणि तिचे पहिल्या कालखंडातील कार्य अभ्यासणार आहोत.

## राष्ट्रवाद [Nationalism]

राष्ट्रवाद ही एक संकल्पना असून त्यामध्ये जनतेच्या मनातील एकतेची भावना आवश्यक व महत्त्वाची असते. भू-प्रदेश, लोकसंख्या, शासनसंस्था व सार्वभौमत्व हे घटक मिळून राज्य बनते पण त्या राज्यातील जनतेच्या मनात एकतेची भावना असेल तर ते राष्ट्र बनते आणि ती भावना म्हणजे राष्ट्रीयत्व होय. जात, धर्म, पंथ, भाषा, प्रादेशिकता या गोष्टींना एकतेच्या भावनेत गौण स्थान असते. याउलट आपण सर्वजण एक आहोत ही ऐक्याची भावना म्हणजे राष्ट्रवाद होय. अनेक विचारवंतांनी राष्ट्रवादाची व्याख्या करण्याचा, त्याचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यानुसार म्हणता येईल प्रत्येक व्यक्तीला

Scanned by CamScanner

राष्ट्रवादाबद्दल वाटणारे प्रेम किंवा असलेली निष्ठा म्हणजे हिंदी राष्ट्रवाद होय. भारतात प्राचीन काळ वैभवसंपन्न होता. अनेक घराण्यांनी आणि राज्यकर्त्यांनी विशाल साम्राज्ये उभारली होती. म्हणजे त्या काळात या देशात राष्ट्रीय भावना होती. पण मध्ययुगात त्या भावना लुप्त झाल्या. ते अंधकार युग असून त्याचाच तो एक परिणाम होता. भारताप्रमाणे युरोपातही त्या युगाचे परिणाम झाले होते. फक्त ते त्यातुन लवकर सावरले गेले. विज्ञानाचा अभ्यास आणि एकुण पुनरुज्जीवन झाल्याने त्यांचा राष्ट्रवाद विकसित झाला. भारतात ब्रिटिश राजवटीमूळे राष्ट्रवादाला गती मिळाली म्हणुन डॉ. आर. सी. मुजुमदार म्हणतात, "The strong current nationalist ideas which passed over the whole Europe during the 19th century must have stimulated the growth of nationalism in India."

## राष्ट्रवादाचा उदय (Rise of Nationalism)

19 व्या शतकात भारतात राष्ट्रवादाचा झालेला उदय ही आधुनिक कालखंडातील अतिशय महत्वाची घटना होय. अर्थात, ही अचानक किंवा आकस्मिकपणे घडलेली घटना नसून त्यामागे अनेक कारणांची परंपरा आहे. ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीविरुद्ध 1857 साली भारतीयांनी उठाव केला. पण तो उठाव देशातील काही प्रदेशापुरता, काही राजेरजवाडे, जमीनदार व शिपायापुरता मर्यादित राहिला. इंग्रजांनी क्रुरपणे उठाव मोडुन काढले. जरी अपयश आले तरी तो उठाव म्हणजे देशाच्या इतिहासातील महत्वाचा टप्पा ठरला. आता आपल्या स्वातंत्र्यासाठी जुने नेतृत्व व जुन्या प्रेरणा यांचा उपयोग होणार नाही याची लोकांना जाणीव झाली. पाश्चात्य शिक्षण घेतलेला एक जाणकार वर्ग देशात उदयास येऊ लागला होता. यात वर्गाने पुढे आपल्या समाजाचे नेतृत्व केले. मराठे, गुजराथी, बंगाली, पंजाबी, जाठ, मद्रासी अशा विविध प्रांतातील आणि हिंदु, जैन, मुस्लीम, पारसी इ. विविध धर्माचे लोक आपल्या देशाचे नागरिक म्हणुन एकत्र येऊ लागले. त्यांच्यात एकतेची भावना वाढीस लागली. राजकीयदृष्ट्या जाणकार, सुशिक्षित लोकांच्या हे लक्षात आले की आखिल भारतीय स्वरुपाच्या संघटनेची फार आवश्यकता

आहे. त्यामध्ये दादाभाई नौरोजी, न्यायमूर्ती रानडे. न्यो. तेलंग, फिरोजशहा मेहता, बद्रुद्दीन तय्यबजी, पी. सुब्रमण्यम आनंद चारलू, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, आनंदमोहन बसू, लालमोहन घोष अशा भारतातील सर्व प्रांतातील अनेक नेत्यांचा सहभाग होता. आपापल्या प्रांतात त्यांनी वेगवेगळ्या संस्था उभारून कार्य सुरु केले होते. आता आवश्यकता होती ती सर्वांसाठी देशपातळीवरील एक व्यासपीठ निर्माण केले. पण ते जाणून घेण्यापूर्वी राष्ट्रवादाचा उदय कसा झाला याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

- **राष्ट्रवादाच्या उदयाची अथवा राष्ट्रसभेच्या (कॉंग्रेस) स्थापनेची कारणे.**

1. **ब्रिटिश साम्राज्यविस्तार :-**

हिंदी राष्ट्रवादाच्या उदयाला ब्रिटिशांचे साम्राज्यवादी धोरण अनेक तज्ञांनी दृष्टीनी उपयुक्त ठरले आहे. व्यापाराच्या उद्देशाने ब्रिटिश या देशात आले. येथील राजकीय अस्थिरतेचा फायदा घेत त्यांनी शस्त्र चालविले. ~~प्रमुख अडथळा दूर झाल्यावर पाहता-पाहता त्यांनी प्रबळ मराठा सत्ता नष्ट केली.~~ ती आणि भारत देश जिंकला. 1818 साली त्यांनी प्रबळ मराठा सत्ता नष्ट केली. तो प्रमुख अडथळा दूर झाल्यावर पाहता-पाहता त्यांनी काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत संपूर्ण हिंदुस्थानावर आपला एकछत्री अमल निर्माण केला. तत्पूर्वी हा देश अनेक छोट्या-छोट्या राज्यांत विभागला होता. प्रत्येकाला आपले राज्य म्हणजेच देश असे वाटत होते. प्रत्येक राज्याचे नियम, कायदेकानू, न्यायव्यवस्था, आर्थिक धोरणे वेगवेगळे होते. राज्याराज्यांत वैर, शत्रुत्व होते. प्रबळ अशी मध्यवर्ती सत्ता नव्हती आणि त्याची कोणाला जाणीव किंवा आवश्यकता वाटत नव्हती. मुघल किंवा मराठे यांनी मोठी साम्राज्ये उभारली. पण संपूर्ण देशावर कोणालाही आपले वर्चस्व निर्माण करता आले नाही. नंतरतर राजकीयदृष्ट्या अस्थिरता आणि कमकुवतपणा वाढतच गेला. त्याचा फायदा घेत सर्व मार्गांचा अवलंब करून इंग्रजांनी साम्राज्यविस्तार केला. या साम्राज्यविस्तारामुळे छोटी छोटी राज्ये नष्ट झाली

## ड) विविध धार्मिक आणि सामाजिक सुधारणा :-

हिंदु धर्मातील आदर्शपणा, तत्वज्ञान आणि त्यांचे खरे स्वरूप बाजूला पडून मध्ययुगात अंधश्रध्दा, कर्मकांडाचे स्तोम माजले होते. त्यामुळे समाजाची फार मोठी अधोगती झाली होती. विकासाचे मार्ग बंद झाले होते. या अंधकारातून समाजाला बाहेर काढण्याचे आणि योग्य दिशा दाखविण्याचे कार्य अनेक धर्म व समाजसुधारकांनी १९ व्या शतकात केले.

१९ व्या शतकात हिंदुस्थानात ब्राम्हो समाज, आर्य समाज, थिऑसॉफिकल सोसायटी, रामकृष्ण मिशन, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज अशा अनेक धर्म संघटनांचे कार्य महत्वाचे आहे. त्यांनी खरा हिंदू धर्म जगासमोर मांडला. त्यांची हि चळवळ म्हणजे धार्मिक पुनरुज्जीवनच होते. त्यांनी हिंदूंची अस्मिता जागी केली. आपला धर्म आणि संस्कृती जगात श्रेष्ठ आहे हे त्यांना पटले. यातून स्वधर्म आणि स्वसंस्कृती याबद्दल त्यांच्या मनात अभिमान निर्माण झाला.

## ढ) आधुनिक शिक्षणाचा परिणाम :

युरोपियन लोकांशी भारतीयांचा संबंध आला. इंग्रजांनी आपली सत्ता निर्माण झाली. त्यामुळे राजवटीचा भारतीयांना पाश्चात्यांच्या आधुनिक शिक्षण व ज्ञानाची जाणीव झाली. इंग्रज राजवटीची भारताला मिळालेली ही फार मोलाची देणगी होती. लॉर्ड बेंटिक हा गव्हर्नर जनरल असताना १८३५ साली ब्रिटिश सरकारने जाहिर केले कि हिंदी लोकांना पाश्चात्य पध्दतीचे इंग्रजी शिक्षण दिले जाईल. ते धोरण ठरविण्यात आणि राबविण्यात लॉर्ड मेकॉले याचा वाटा फार मोठा होता. १८३३ साली इंग्लंडच्या संसदेत याबद्दल मेकॉले असे म्हणाले कि 'आमच्या समाज पध्दतीमुळे भारतीय जनमत विकसित होईल आणि कदाचित आमच्या पध्दतीच्या समोर निघून जाईल. पण आम्ही आमच्या उत्तम प्रशासनाद्वारे आमच्या प्रजेला चांगले प्रशासन करण्यास तयार केले पाहिजे म्हणजे ते लोक युरोपियन भाषेत शिक्षित होऊन भविष्यकाळात युरोपियन संस्थांची मागणी करतील. ब्रिटिश सरकारने अनेक सुधारकांच्या मदतीने पाश्चात्य शिक्षण देणाऱ्या संस्था भारतात सुरु केल्या. तेथे पाश्चात्यांची

संस्कृती, त्यांच्या कला, सामाजिक व भौतिकशास्त्रे, त्यांचा इतिहास, इंग्रजी भाषा इ. विषयांचे शिक्षण भारतीयांना मिळू लागले आणि आधुनिक शिक्षणाचे युग सुरु झाले.

## ५) भौतिक सुधारणा :-

इंग्रजांनी पक्के व मोठे रस्ते, रेल्वे, तारायंत्र पोस्ट अशा दळणवळणविषयक अनेक भौतिक सुधारणा १९ व्या शतकात फार मोठ्या प्रमाणावर केल्या. अर्थात या सुधारणा करण्यामागे भारताचे जास्तीतजास्त आर्थिक शोषण करणे, वेगवान लष्करी हालचाली करणे, राज्यकारभारावरिल आपली पकड अधिक घट्ट करणे असे त्यांचे अनेक स्वार्थी हेतु होते. त्यांचे हेतू त्यांनी सफल केले देखील. तथापि, या भौतिक सुधारणांचे भारतीयांनादेखील अनेक फायदे झाले. या सुधारणांमुळे भारतातील प्रमुख शहरे एकत्र जोडली गेली. प्रांताप्रांतामधील दुरावा, अंतर कमी होऊन अनेक अर्थांनी ते जवळ आले. भावनात्मकदृष्ट्या एकदुसऱ्याला जोडले जाण्यास मदत झाली. मद्रासहून पंजाबला येणे जाणे - येणे शक्य व सुलभ झाले तर पंजाबहून मुंबई, बंगालला जाणे - येणे शक्य झाले. त्यामुळे भारतातल्या विविध प्रांतातील भारतीय लोक, सुधारक, नेते एकमेकांना भेटून विचारविनिमय करु लागले. थोडक्यात दळणवळणांच्या सुधारणामुळे राजकीय सामाजिकदृष्ट्या भारत एकसंघ होण्यास आणि राष्ट्रवादाच्या उदयाला मदत झाली.

## ६) भारतीय वृत्तपत्रे :-

वृत्तपत्र हे जनजागृतीचे फार उपयुक्त असे साधन असते. शासनाचे चुकीचे व अन्यायकारक धोरण आणि निर्णय दाखवून देणे, जनतेवर होणारे अन्याय समाजापुढे मांडणे. समाजसुधारणा आणि विकासासाठी आवश्यक ते प्रबोधन करणे अशी महत्वपूर्ण भूमिका वृत्तपत्रे करु शकतात. अन्यायी राजवटीत निर्भीडपणे लिखाण करणाऱ्या वृत्तपत्रांची भूमिका तर फार महत्वाची ठरते. साहजिकच ब्रिटिश राजवटीत हिंदी राष्ट्रवादाच्या उदयाला गती देणारे वृत्तपत्र हे महत्वाचे साधन ठरले. इंग्रजांकडून भारतीयांवर होणारे अन्याय, आर्थिक पिळवणूक, पक्षपात, इंग्रज नोकरशाहीकडून केले जाणारे जुलूम अशा अनेक चुकीच्या गोष्टींविरुद्ध वृत्तपत्रांनी लिखाण

करून जनजागृती केली. त्यांच्यावर केल्या जाणाऱ्या अन्यायाविरुद्ध जनतेत असंतोष निर्माण केला. लॉर्ड लिटनने दडपशाही करून वृत्तपत्रांवर अनेक बंधने लादली पण त्याचा उलट परिणाम झाला. आणि वृत्तपत्रांनी देशसेवेचे व्रत चालून ठेवले. त्याउलट लॉर्ड रिपनच्या उदारमतवादामुळे वृत्तपत्राला प्रोत्साहन मिळाले. जनजागृतीच्या कार्याचा प्रारंभ राजा राममोहन रॉय यांनी आपल्या 'संवाद कौमुदी' या वृत्तपत्रातून केला. महाराष्ट्रात १८३२ साली बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' हे वृत्तपत्र वयाच्या केवळ २०व्या वर्षी सुरू केले.

## ६) ब्रिटिशांकडून भारतीयांची भयंकर व आर्थिक पिळवणूक :-

इंग्रजांनी हिंदुस्थानावर आपले साम्राज्य निर्माण केले. त्यांनी अगदी पद्धतशीरपणे भारताची आर्थिक पिळवणूक केली. हा देश दरिद्री बनविला. भारतातील हस्तोद्योग जगप्रसिद्ध होते. निर्यातक्षम उत्पादने तयार होत होती. स्वतःच्या स्वार्थासाठी आणि त्यांची इंग्लंडमधील कारखानदारी विकसित करण्यासाठी इंग्रजांनी ते हस्तोद्योग नष्ट केले. हिंदी कारागिरांना कठोर शिक्षा केल्या. भारतीय उद्योगधंद्यांवर जबर कर आकारले. हा देश केवळ कच्चा माल पुरवणारी वसाहत आणि इंग्रजांचा पक्का माल खरेदी करणारी हुकमी बाजारपेठ बनविली. दोन्ही प्रकारच्या मालाचे दरभाव इंग्रज ठरवीत असत. ते दरभाव अर्थातच त्यांच्या प्रचंड फायद्याचे असत. त्यातून होत गेली ती भारतीयांची केवळ आर्थिक पिळवणूक. भारताचे चाललेले हे आर्थिक शोषण शास्त्रशुद्धपणे समाजासमोर मांडण्याचे मोलाचे कार्य दादाभाई नौरोजी यांनी केले. इंग्रजांनी अखंडपणे आणि कित्येक वर्षे भारताच्या चालविलेल्या या आर्थिक पिळवणुकीत जनतेत असंतोष वाढत गेला आणि असंतोष तर राष्ट्रवादाच्या उदयाला आणि विकासाला पूरक असतो.

Scanned by CamScanner

GoodLuck Page No.
Date

7) राष्ट्रीय साहित्य आणि साहित्यीक :

वृत्तपत्राप्रमाणेच १९ व्या शतकात अनेक साहित्यिकांनी आपल्या लिखाणातून जनजागृतीचे मोलीक कार्य केले. त्यांचे ते लिखाण तमाम भारतीयांना प्रेरणा देणारे राष्ट्रीय साहित्य ठरले. मराठीत लोकहितवादि विष्णुशास्त्री चिपळुणकर, शि. म. परांजपे, बंगालमधील बंकिमचंद्र चटर्जी, मायकेल मधुसूदन दत्त, दिनबंधु मित्र, नवीनचंद्र सेन, रवींद्रनाथ टागोर, हिंदीमध्ये भारतेंदु हरिश्चंद्र, तामिळमध्ये सुब्रम्हण्यम भारती या सर्व लेखकांनी आपापली मातृभाषा लोकप्रिय आणि प्रागतिक बनवली. मातृभाषेविषयीचा त्यांचा अभिमान राष्ट्रवादाला प्रेरक आणि उपयुक्त ठरला. याचे एक अत्यंत उत्तम आणि तेजस्वी उदाहरण म्हणजे बंकिमचंद्र चटर्जी यांची आनंदमठ ही कादंबरी आणि त्यातील 'वंदे मातरम्' हे गीत काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत संपूर्ण स्वातंत्र्यसेनानीचे घोषगीत आणि प्रेरणास्त्रोत बनले होते. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी आपल्या निबंधमालेतून मराठीला यसस तेजस्वी स्वरूप मिळवुण दिले होते. अशा साहित्यातून जनजागृती आणि वैचारिक क्रांती झाली की जी राष्ट्रवादाच्या उदयाला उपयुक्त ठरली.

8) इंग्रजांचा वंशश्रेष्ठत्वाचा अहंकार आणि उद्दामपणा :

काही अपवाद सोडल्यास इंग्रज अधिकारी भारतीय जनतेशी अत्यंत उद्दामपणे वागत असत. सहानुभूती नावाची गोष्ट त्यांच्याकडे आजिबात नव्हती. भारतीयांकडे ते कुत्सितपणे बघत असत. दगडांची व जनावरांची पूजा करणारे रानटी लोक म्हणजे भारतीय असे समजत. ते अर्धे निग्रो आणि अर्धे गोरिला प्रकारातील प्राणी आहेत. भारतमंत्री लॉर्ड हॅमील्टन म्हणाला होता कि हिंदी लोक म्हणजे डोकेफिरू गुन्हेगारी असून त्यांना इंग्लीश घटनेतील हक्क देता येणार नाही. एका जबाबदार अधिकाऱ्याचा असा दृष्टिकोण असेल तर दुय्यम इंग्रज अधिकारी भारतीयांशी किती क्रूरपणे वागत असतील याची कल्पना येते. इंग्रजांकडुन भारतीयांवर केल्या जाणाऱ्या अन्यायाविरुद्ध दाद मिळत नसे. इंग्रज वृत्तपत्रे त्यांचीच बाजू घेत असत. वरिष्ठ अधिकारी त्यांना पाठीशी घालत. प्रसंगी किरकोळ शिक्षा केली जाई. गोऱ्या लोकांविरुद्धचा खटला फक्त गोऱ्या न्यायाधिशासमोर

Scanned by CamScanner

चालवत जात असे याचा अर्थ अगदी सरळ होता. साहजीकच असे न्यायाधीश आपल्या जातभाईंना काय शिक्षा देणार?
इंग्रजांच्या श्रेष्ठत्वाची अशी अनेक उदाहरणे सांगितली आहेत. त्यामुळे सुशिक्षित हिंदी लोकांच्या मनात आपल्या गुलामगिरीविरुद्ध चीड निर्माण होणे साहजिकच होते. या वेळेतून आपण एकत्र येणे आणि संघटना उभारणे आवश्यक ठरले.

9) क्रांतिकारकांचे ~~भाग~~ कार्य:

परकीय ब्रिटिश सत्तेविरुद्ध सुरुवातीपासून वेगवेगळे उठाव झाले होते. या सर्व उठावांमागे राष्ट्रीय वृत्ती नसेलही पण अन्याया-विरुद्ध लढण्याची भारतीयांमधील क्रांतिकारक प्रवृत्ती त्यामागे निश्चित होती. बंगालमधील संथाळ, मुंबई प्रांतातील रामोशी, भिल्ल व कोळी, मद्रासमधील पाळेगार, ओरिसातील खोंड, आसाममधील खासी यांचे उठाव तसेच मुंबई प्रांतातील वासुदेव बळवंत फडके यांचा उठाव तर राष्ट्रीय वृत्तीचा क्रांतिकारक प्रयत्न होता. 1857 चा उठाव तर स्वातंत्र्यवीर सावरकरांसारख्या देशभक्ताला पहिले स्वातंत्र्ययुद्ध होते. इंग्रजांनी हे सर्व उठाव मोडून काढले. क्रांतिकारकांना अपयश आले हे खरे आहे. परंतु त्यामुळे परकीय, जुलमी ब्रिटिश राजवटीविरुद्ध भारतीयांतील असंतोष, चीड व्यक्त होत होती. त्यापासून भारतीय लोक प्रेरणा व बोध घेत होते. यातून राष्ट्रवादाचा उदय होण्यास हातभार लागला.

10) लॉर्ड लिटनची जुलमी राजवट:

1876 ते 1880 हा व्हाइसरॉय लॉर्ड लिटनचा कालखंड म्हणजे दडपशाही, अन्याय आणि जुलमी राजवट ठरली. जेव्हा हिंदुस्थानात राजकीय जागृती होऊ लागली होती तेव्हा हा प्रतिगामी अधिकारी सत्तेवर होता. त्याचे अनेक निर्णय आणि कायामुळे जनतेतील असंतोष वाढत गेला. ब्रिटिश संसदेने इंग्लंडच्या राणीस 'हिंदुस्थानची सम्राज्ञी' म्हणून घोषित केले. तेव्हा लिटनने त्यानिमित्त 1877 साली दिल्लीस भव्य दरबार भरविला. त्यासाठी देशातील सर्व राजेरजवाड्यांना पाचारण केले. या दरबारासाठी त्याने प्रचंड खर्च केला. त्यावेळी दक्षिण भारतात फार मोठा दुष्काळ पडला होता. त्यात लाखो लोक मरण पावले होते. दुष्काळग्रस्तांना मदतीऐवजी लिटनने पैशाची उधळपट्टी केली.

Scanned by CamScanner

त्यामुळे जनतेत भयंकर संताप निर्माण झाला. रोम जळताना नीरो फिडल वाजवतो अशा संतप्त प्रतिक्रिया त्यांच्याबद्दल उमटल्या.

11) इल्बर्ट बिल :-

लॉर्ड लिटनच्या अगदी विरुद्ध अर्थाने त्याच्यानंतर अधिकारावर आलेल्या लॉर्ड रिपनची राजवट राष्ट्रवादाच्या उदयाला कारणीभूत ठरली. 1880 साली लॉर्ड रिपन व्हाईसरॉय म्हणून दाखल झाले. त्याचे धोरण पुरोगामी उदारमतवादी होते. लिटनच्या काळात झालेले अन्याय दूर करण्याचे रिपनने ठरवले. अफगाण युद्ध सन्मानाने संपवले. प्रेस आणि आर्म्स ॲक्ट रद्द केले. प्रशासनात भारतीयांना सामावून घेतले. त्यांना मानाची पदे दिली.

प्रांताच्या राजधानीशिवाय इतरत्र असलेल्या हिंदी न्यायाधीशांनी युरोपियन गुन्हेगारांची चौकशी करण्याचा अधिकार नव्हता. ही व्यवस्था म्हणजे सरळ सरळ वांशिक भेदभाव होता. तसेच हिंदी न्यायाधीशांवर अविश्वास दाखविणारी गोष्ट होती. लॉर्ड रिपनने या अन्यायाकडे लक्ष दिले त्यात सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार कायदामंत्री लॉर्ड इल्बर्ट याने हे भेदभाव दूर करणारे बिल संसदेत मांडले. त्याला इल्बर्ट बिल असे म्हणतात. हे बिलच हिंदी राष्ट्रवादाच्या उदयाला अंशतः कारणीभूत ठरले. हे बिल म्हणजे युरोपियन लोकांना आपला अपमान वाटला. काळ्या माणसाकडून चौकशी झाल्यास आपणाला जबर शिक्षा होईल अशी भीती त्यांना वाटली. म्हणून या बिलाविरुद्ध युरोपीय लोक संघटित झाले. त्यांनी डिफेन्स असोसिएशन नावाची संघटना उभारली आणि या बिलाविरुद्ध तसेच रिपनविरुद्ध चळवळ सुरू केली. इंग्लंडमध्ये तशा चळवळी झाल्या. शेवटी ब्रिटिश संसदेने हस्तक्षेप केला आणि या बिलाला दुरुस्ती केली. या घटनेतून स्पष्ट झाले कि युरोपीय हिंदी लोकांकडे तुच्छतेने पाहतात. तसेच या रूपाने लोकशाही पद्धतीने आपल्या मागण्या मान्य होण्यासाठी आंदोलन, चळवळ कशी करावी याचे ज्ञान भारतीयांना मिळाले.

Scanned by CamScanner

## ब) भारतीय राष्ट्रसभेची (कॉंग्रेस) स्थापना.

अनेक कारणातुन, घटनातून १९व्या शतकात भारतीय लोक जागृत झाले होते. आपसातील भेदभाव विसरून ते संघटित होऊ लागले होते. आधुनिक शिक्षणाने लोकशाही, स्वातंत्र्य, हक्क-कर्तव्ये, उदारमतवाद, राष्ट्रवाद हि पुरोगामी मुल्ये त्यांना कळू लागली होती. शस्त्र आणि युध्दाऐवजी सनदशीर मार्ग योग्य व आवश्यक आहे हे सुशिक्षित हिंदी लोकांनी ओळखले त्यांनी त्यादृष्टीने अनेक प्रांतात प्रयत्न सुरू झाले. १८३३ साली मेकाले म्हणाल्याप्रमाणे पाश्चात्य शिक्षण घेतलेले हिंदी लोक पाश्चात्य संस्थांची मागणी करतील. सुमारे ५० वर्षानंतर राष्ट्रसभेच्या स्थापनेच्या रूपाने त्यांची दुरदृष्टी सत्य ठरली. पण तत्पूर्वी भारतातील काही प्रांतात अनेक संघटना स्थापन झाल्या होत्या. एकप्रकारे कॉंग्रेसच्या स्थापनेला अनुकुल किंवा पूरक केंद्र ठरलेले. या देशातील नजीकचे यशस्वी प्रयत्न होते म्हणुन त्यांची नोंद घेणे आवश्यक आहे.

## बंगाल इलाख्यातील राजकीय संघटना

### १) बंगभाषा प्रसारिका सभा।

हि सभा १८३६ साली स्थापन झाली. ती राजकीय कार्य करणारी संघटना होती. तिच्या बैठका घेऊन राजकीय विषयावर चर्चा होत असत. सरकारी धोरणावर चर्चा होऊन अपेक्षित सुधारणांसाठीचे प्रस्ताव सरकारकडे पाठविले जात असत.

### २) जमीनदारांची संघटना:

नावावरूनच लक्षात येते कि ही जमीनदार लोकांची संघटना असुन १८३७ साली द्वारकानाथ टागोर यांनी स्थापना केली. जमीनदारांच्या हिताचे रक्षण करणे हे तिचे उद्दिष्ट होते. त्यासाठी सनदशीर मार्गाचा अवलंब केला जाई. भारतातील काही ब्रिटिशांची तिला सहानुभूती तर होतीच पण इंग्लंडमधील ब्रिटिश इंडिया सोसायटीशी देखील संपर्क होता. ही सोसायटी १८३९ साली जॉर्ज थॉमसन यांनी लंडन येथे स्थापन केली होती. पुढे १८५१ मध्ये या दोन्ही संस्थांचे एकीकरण करून तिला ब्रिटिश इंडिया सोसायटी असे नाव दिले.

Scanned by CamScanner

3) इंडियन असोसिएशन :

१९ व्या शतकात देशात जनजागृती वेगाने होऊ लागली. विशेषत: बंगालमध्ये राजकीय जागृती आणि संघटितपणा वाढत गेला. १८५७ च्या उठावामुळे कंपनीची सत्ता संपून भारताचा कारभार ब्रिटिश पार्लमेंटकडे गेला. त्यानंतर घटनात्मक विकासाला महत्व आले. अशा बदलत्या परिस्थितीत १८७५ साली शिशीकुमार घोष यांनी इंडियन लीग नावाची संस्था स्थापन केली. जनतेत राजकीय जागृती करणे हा उद्देश होता. घोष हे 'अमृत बझार पत्रिका'चे उत्पादक होते. त्यानंतर २६ जुलै १८७६ रोजी सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी इंडियन असोसिएशन ही संघटना स्थापन केली. त्यांनी मुंबई, मद्रास, बनारस, अलाहाबाद, अमृतसर, लाहोरपर्यंत म्हणजे देशभर दौरा करून जनजागृती केली. त्यामुळे त्यांच्या संघटनेला अखिल भारतीय स्वरूप मिळाले. १८८३ साली त्यांनी प्रदर्शनाच्या निमित्ताने राष्ट्रीय परिषद (National Conference) कलकत्ता येथे बोलावली त्याला १०० प्रतिनिधी हजर होते.

• मुंबई इलाख्यातील राजकीय संघटना

1) बॉम्बे असोसिएशन :

१८५२ साली समाजसेवक जगन्नाथ शंकरशेठ यांच्या पुढाकाराने हि स्थापन झाली. जनतेत प्रश्न, अडचणी सरकारपर्यंत पोहचविणे आणि सनदशीर मार्गाने सोडविणे असे संस्थेचे उद्देश होते. कायदे मंडळात भारतीयांना प्रतिनिधीत्व मिळावे, नोकरीत उच्च पदे मिळावीत अशा मागण्या संस्थेने सरकारकडे केल्या.

2. पुणे सार्वजनिक सभा :

1867 साली गणेश वासुदेव जोशी (सार्वजनिक काका) यांनी ही संस्था स्थापन केली. औद्योगिकरण, शेती, स्वदेशी विषयी या संस्थेने कार्य केले.

3) बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन :

1875 साली फिरोजशहा मेहता, बद्रुद्दीन तय्यबजी, तेलंग यांनी हि संस्था स्थापन केली. जनतेच्या अडचणी अर्ज, विनंतीद्वारा शासनाला कळविणे हा उद्देश होता.

Scanned by CamScanner

• मद्रास इलाख्यातील संघटना :

मद्रास नेटिव्ह असोसिएशन बंगालमधील ब्रिटिश इंडियन असो. ची शाखा म्हणून या संघटनेची स्थापना केली. १८५७ च्या कायद्याच्या अगोदर या संस्थेत ब्रिटिश संसदेला एक निवेदन पाठविले होते. ही संस्था फारशी प्रभावी ठरली नाही.

२ महाजन सभा :

लिटनच्या जुलमी धोरणाची प्रतिक्रिया म्हणजे या संस्थेची १८८८ साली झालेली स्थापना होय. कायदेमंडळाचा विस्तार, भारतीयांनी त्यात अधिक प्रतिनिधीत्व, सत्तेचे विभाजन अशा राजकीय मागण्या या संस्थेने सरकारकडे केल्या होत्या.

• भारताबाहेरील संघटना

दादाभाई नौरोजी यांनी 1865 साली लंडन येथे इतरांच्या मदतीने 'लंडन इंडियन सोसायटी' या संस्थेची स्थापना केली. अध्यक्ष दादाभाई होते. तर सचिव व्योमेशचंद्र बॅनर्जी होते. या संस्थेच्या काही निवृत्त ब्रिटिश अधिकारीही होते. तिच्या शाखा भारतातही होत्या. 1872 साली आनंदमोहन बोस यांनी 'इंडियन सोसायटी' ची स्थापना केली. ते केंब्रिज विद्यापीठात शिकत होते. इंग्लंडमधील भारतीयांना संघटित करणे, भारतातील समस्यांबाबत प्रयत्न करणे हे उद्देश होते.

• भारतीय राष्ट्रसभेची (काँग्रेस) स्थापना 1885

वरीलप्रमाणे अनेक प्रांतात वेगवेगळ्या संघटना अन्यायाविरुद्ध म्हणजे दाद मागण्याचे कार्य करीत होत्या. तथापि, अजून सर्व देशाचे प्रतिनिधीत्व करणारी इत्यादी 'अखिल भारतीय' अशी राजकीय संस्था स्थापन झाली नव्हती. अशा संस्थेची आवश्यकता आहे हे सर्वांना पटले होते. तशी संस्था निर्माण करण्याचा मान सेवानिवृत्त इंग्रज ICS अधिकारी ॲलन ह्युम यांच्याकडे जातो. या कामी त्यांना सर विल्यम वेडरबर्न व सर हेन्री कॉटन या दोन सेवानिवृत्त इंग्रज अधिकाऱ्यांची मदत झाली. हे सर्व इंग्रज अधिकारी त्यांच्या साम्राज्याशी एकनिष्ठ होते. त्यांनी महत्त्वाच्या पदावरुन सेवाही केली होती. पण त्यांच्याकडे काही वेगळे गुण व दुरदृष्टी होती. त्यांनी हिंदी त्यापलीकडे

लोकांची केली जाणारी पिळवणूक, त्यांच्या समस्या आणि इ. त्ये जवळून पाहिली होती. जनतेत असंतोष आणि त्यांचे संभाव्य परिणाम त्यांनी जाणले होते. तेव्हा हा असंतोष दडपू दडपून न टाकता त्याला वेगळे, विधायक वळण देणे साम्राज्याच्या हिताचे ठरेल असे त्यांना वाटत होते. त्यासाठी अखिल भारतीय व्यासपीठ स्थापन होणे त्यांच्या प्रत्नीने आवश्यक होते.

1857 च्या उठावादरम्यान ह्यूम इटवा जिल्ह्याचे मॅजिस्ट्रेट होते. त्यांनी हा उठाव प्रत्यक्ष पाहिला होता. त्यांच्या मते, ब्रिटिश साम्राज्य वरून दिसते तेवढे सुस्थिर नाही. हिंदी असंतोषाची दखल न घेतल्यास ब्रिटिश साम्राज्य त्यात नष्ट होईल. वेडरबर्नने वासुदेव बळवंत फडके यांचे बंड प्रत्यक्ष अनुभवले होते. याची दखल न घेतल्यास अनेक वासुदेव तयार होतील असे त्याचे मत होते. तेव्हा शस्त्रबळाने हा असंतोष दडपून टाकण्याचे त्याला विधायक चळवळीचे वळण देणे योग्य ठरले. या कामी ह्यूमने पुढाकार घेतला. प्रथम त्याने कलकत्ता विद्यापीठाच्या पदवीधारांना एक परिपत्रक पाठवले आणि हिंदुस्थानच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय संघटना आवश्यक असल्याचे आवाहन केले. त्यांना उत्तम प्रतिसाद मिळाला. त्या सर्वांच्या सहकार्याने त्यांनी 1884 च्या अखेरीस इंडियन नॅशनल युनियन स्थापन केली. मार्च, 1885 मध्ये युनियनच्या बैठकीत ठरविले कि डिसेंबरमध्ये पुणे येथे राष्ट्रीय परिषद भरविली जाईल. दरम्यान इंग्लंडला जाऊन ह्यूमने त्यासाठी लोकांची सहानुभूती मिळविली. व्हाइसरॉय लॉर्ड डफरिन भेटला. इंग्लंडमधील विरोधी पक्षाप्रमाणे या भावी संघटनेने कार्य करावे असा सल्ला डफरीनने दिला. ह्यूमला आणि हिंदी लोकानेत्यांना हा विचार पटला.

डिसेंबर 1885 मध्ये पुण्यात कॉलऱ्याची साथ सुरु होती म्हणून मुंबईला अधिवेशन घेण्याचे ठरले. त्यानुसार 28 डिसेंबर 1885 च्या पहिल्या अधिवेशनाला देशातील एकूण 72 सदस्य हजर होते त्यामध्ये मुंबई 18, पुणे 8 असे मिळून मुंबई इलाख्याचे 38, मद्रास 8 कलकत्ता 3, लखनौ 3 इत्यादि प्रांतांचे हजर होते दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, न्या. तेलंग, दिनशा वाच्छा, नरेंद्रनाथ सेन, गिरिजाभूषण मुखर्जी, न्या. रानडे, डॉ. भांडारकर, आगरकर, टिळक, रंगय्या नायडू, अय्यर, जी. सुब्रमण्यम, गंगाप्रसाद वर्मा

नेते समाविष्ट होते. मुंबईच्या गोकुळदास तेजपाल संस्कृत विद्यालयाच्या इमारतीत भरलेल्या या अधिवेशनाचे अध्यक्ष कलकत्याचे कायदेपंडित आणि विचारवंत व्योमेशचंद्र बॅनर्जी होते. सचिव म्हणून ह्यूम यांची निवड झाली. या अधिवेशनात हिंदी राष्ट्रसभेची (Indian National Congress) स्थापना करण्यात आली. या अधिवेशनात एकूण नऊ ठराव पास झाले. काँग्रेसच्या कार्यास आणि विकासाला सुरुवात झाली.

## • राष्ट्रसभेची ध्येय-धोरणे

राष्ट्रसभेच्या पहिल्या अधिवेशनात अध्यक्ष उमेशचंद्र बॅनर्जी यांनी आपल्या भाषणात राष्ट्रसभेची ध्येय-धोरणे स्पष्ट केली. त्यानुसार

1. देशाच्या भिन्न-भिन्न प्रदेशांतील कार्यकर्त्यांत जवळीक व मैत्री निर्माण करणे.
2. वंश, पंथ, प्रांत हा भेदभाव नष्ट करण्याचा प्रयत्न करणे.
3. राष्ट्रीय ऐक्याची भावना व संघटन वाढीस लागणे.
4. सामाजिक प्रश्नावर सुशिक्षितांच्या मतांची दखल घेणे.
5. पुढील कार्यक्रमांचा विचार करणे इ.

पहिल्या अधिवेशनात अशी ध्येय-धोरणे घोषित केली तरी परिस्थितीप्रमाणे राष्ट्रसभा विकसित आणि प्रभावी बनत गेली. तसतशी ध्येय-धोरणे, मागण्यादेखील वाढत गेल्या.

## क मवाळ राजकारणाचा कालखंड (1885 - 1905)

### (contribution of Moderates)

स्थापनेपासून ते देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत म्हणजे 1885 ते 1947 या एकूण काळातील काँग्रेसच्या कार्याचे तीन कालखंड 1885 ते 1905, 1905 ते 1920 आणि 1920 ते 1947 असे होते. अनुक्रमे मवाळ, जहाल आणि गांधी युग अशा त्या अवस्था आहेत. त्यापैकी पहिल्या कालखंडातील काँग्रेसला मवाळ म्हटले जाते. या कालखंडातील काँग्रेसच्या राजकारणावर दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, दिनशा वाच्छा, व्योमेशचंद्र बॅनर्जी, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, न्या. रानडे इ. नेत्यांचा प्रभाव होता. ते उदारमतवादी असुन मवाळ राजकारणावर त्यांचा विश्वास होता. सामाजिक समता, कायद्यापुढे सर्व समान, नागरी स्वातंत्र्य, प्रातिनिधीक संस्थांचा विकास असे त्यांचे उद्देश होते. मवाळ विचारसरणी किंवा मार्ग म्हणजे

काय ? हे स्पष्ट करताना न्या. रानडे म्हणतात. मवाळ म्हणजे अप्राप्य गोष्टींची आशा न धरणे, जे मिळण्यासारखे आहे. त्यासाठी चांगला व समझोत्याचा मार्ग अवलंबणे होय.

## • काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनातील ठराव.

28 डिसेंबर, 1885 रोजी मुंबई येथे भरलेल्या काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनात खालीलप्रमाणे नऊ ठराव पास झाले.

1. राज्यकारभाराच्या चौकशीसाठी एक रॉयल कमिशन नेमले जावे आणि त्यात योग्य प्रमाणात हिंदी प्रतिनिधी असावेत.
2. भारतमंत्र्याचे इंडिया कौन्सिल रद्द करावे.
3. मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळात हिंदी प्रतिनिधींची संख्या वाढवावी. कायदेमंडळात अंदाजपत्रके मांडली जावीत. सदस्यांना प्रश्न विचारण्याचा हक्क असावा.
4. ICS परीक्षा इंग्लंडप्रमाणे भारतातही घेतली जावी. त्यासाठी वयाची अट 23 वर्षे असावी.
5. लष्करी खर्च कमी करावा त्यात इंग्लंडचाही वाटा असावा.
6. भारतीय मालाला संरक्षण मिळेल असे धोरण ब्रिटिशांनी अवलंबावे.
7. ब्रह्मदेश खालसा करू नये.
8. हे ठराव विचारविनिमय व पास करण्यासाठी प्रांतिक राजकीय संघटनेकडे पाठवावेत.
9. काँग्रेसचे पुढील अधिवेशन 28 डिसेंबर, 1886 रोजी कलकत्ता येथे व्हावे.

## • काँग्रेसची अधिवेशने.

पहिल्या अधिवेशनात ठरल्याप्रमाणे दरवर्षी 28 डिसेंबरला काँग्रेसचे अधिवेशन वेगवेगळ्या ठिकाणी होत राहिले. प्रत्येक अधिवेशनाचा वृत्तांत देणे आवश्यक वाटत नाही. सुरवातीच्या काही अधिवेशनात थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे देता येईल.

दुसरे अधिवेशन 28 डिसेंबर 1886 रोजी कलकत्ता दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली झाले. 426 प्रतिनिधी हजर होते. अधिवेशनात ठरले कि काँग्रेसने यापुढे राजकीय व्यासपीठ म्हणून कार्य करावे. अनेक ठराव पास केले.

तिसरे अधिवेशन 1887 साली मद्रास येथे सर बद्रुद्दीन तैयबजी यांच्या अध्यक्षतेखाली झाले. 607 प्रतिनिधी हजर होते. ह्यूम यांनी सरकारवर असहकाराची भूमिका टिका केली,

चौथे अधिवेशन 1888 साली अलाहाबाद येथे स्कॉटिश व्यापारी जॉर्ज युल यांच्या अध्यक्षतेखाली झाले. 1248 प्रतिनिधी हजर होते. सरकारने असहकाराची भूमिका घेतली होती.

पाचवे अधिवेशन 1889 साली मुंबईला वेडरबर्न यांच्या अध्यक्षतेखाली झाले. त्याला 1889 सदस्य हजर होते. ब्रिटिश संसद चार्लस ब्रॅडला हजर होते.

याप्रमाणे 1905 पर्यंत दरवर्षी अधिवेशन घेतले गेले. एकूण या पहिल्या कालखंडात काँग्रेसने केलेले कार्य खालीलप्रमाणे देता येईल.

## 1. राजकीय जागृती आणि राष्ट्रवादाचा विकास :

पहिल्या कालखंडातील काँग्रेसचे हे फार महत्वाचे कार्य होय. हिंदी जनतेला राजकियदृष्ट्या जागृत केले. अगदी दुसऱ्या अधिवेशनात ठरविले गेले की देशासाठी एक राजकीय व्यासपीठ म्हणून काँग्रेसने कार्य करावे. देशाच्या वतीने झालेला हा निर्णय फार मोठे यश होते. नागरी स्वातंत्र्य, लोकशाही, हक्क इ. गोष्टी जनतेपर्यंत पोहचविल्या त्यातून राजकीय जागृती निर्माण केली गेली. अनेक कार्यकर्ते, नेते या काळात तयार झाले. आधुनिक राजकारणाचे धडे त्यांना मिळाले. तिसऱ्या अधिवेशनात ह्यूम यांनी इंग्रज सरकारवर कडक टिका करुन राजकीय हक्कासाठी काँग्रेसने चळवळ करावी असे सुचविले.

## 2. जनतेची गाऱ्हाणी सरकारकडे मांडली.

भारतीयांच्या सर्व क्षेत्रातील समस्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्याचे काम काँग्रेसने केले. त्यावर विचार करण्यासाठी सरकारने 'रॉयल कमिशन' नेमावे अशी मागणी केली. काँग्रेसने सरकारकडे शेतकऱ्यांच्या समस्या मांडल्या. उदा. शेतीला पाणी पुरवठ्यासाठी धरणे बांधा, कालवे खोदा, शेतकऱ्यांना कमी व्याजात कर्जपुरवठा करा, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत करा. इ. औद्योगिकीकरणास चालना द्या. युवकांना नोकऱ्या द्या. शैक्षणिक सुधारणा करा, स्पर्धा परिक्षा भारतात द्या. वांशिक भेदभाव असणारे कायदे रद्द करा. स्थानिक स्वराज्य संस्थांत हिंदी लोकांचे सहकार्य करु द्या. अशा विविध मागण्यांसाठी सरकारवर दबाव आणला आणि चळवळी उभारल्या

Scanned by CamScanner

3. **काँग्रेसचे इंग्लंडमधील कार्य :**

भारतात सुधारणा आणि विकासाचे निर्णय इंग्लंडमध्ये होणार असल्याने तेथील जनमत अनुकूल करणे महत्त्वाचे होते. त्यासाठी काँग्रेसने जाणीवपूर्वक कार्य केले. उदा. 1887 साली दादाभाईंनी इंग्लंडमध्ये इंडियन रिफॉर्म असोसिएशन ही संघटना स्थापन केली. तेथील काही नेत्यांच्या सहकार्याने त्यांनी हिंदी प्रश्न लोकांना समजावून दिले. 1899 साली राष्ट्रसभेची एक ब्रिटिश समिती स्थापन केली. त्यात ह्यूमसह पाच सदस्य होते. त्यांनी सभा, पत्रके, लिखाण इत्यादींमार्फत हिंदी मागण्यांबाबत इंग्रज जनतेला माहिती दिली. त्यांनी परि इंग्लंडमध्ये India नावाचे मासिक सुरू केले आणि त्यामधून भारतातील सत्य परिस्थिती ब्रिटिश जनतेसमोर मांडली.

4. **भारतमंत्र्यांच्या कार्यालयाबाबतचे कार्य.**

1858 च्या कायद्याने भारताचा राज्यकारभार ब्रिटिश संसदेकडे आला. संसदेने त्यासाठी भारतमंत्र्याची नेमणूक केली. त्याच्या मदतीसाठी 15 सदस्यांचे एक 'भारत मंडळ' निर्माण केले. त्या सर्वांचा पगार हिंदी तिजोरीतून देण्याची तरतूद केली. त्यासाठी दरसाल 35 लाख रु. खर्च होत होता. अन्य वसाहतींसाठीच्या अशा खर्चाची तरतूद संसद करत असे. भारताबाबतही तसेच व्हावे अशी काँग्रेसची मागणी होती. काँग्रेसच्या पहिल्याच अधिवेशनात तसा ठराव पास केला होता. त्यानंतरही काँग्रेस त्या मागणीचा पाठपुरावा करत राहिली.

5) **परदेशातील भारतीयांच्या समस्यांकडे लक्ष दिले.**

ब्रिटिश साम्राज्य जगभर होते. ब्रिटिश सरकारने भारतीय मजूर त्यांच्या वसाहतीत सर्वत्र पाठविले होते. परंतु तेथे भारतीयांना अतिशय वाईट वागणूक मिळत असे. त्यांच्यावर अन्याय केले जात. नाताळ तेथील हिंदी मजुरांचा मतदानाचा हक्क नाकारला तर अन्य ठिकाणी त्यांना शहराबाहेर ठेवले. हिंदी लोकांना काळे पाणी म्हणून वंशभेदाने तुच्छ लेखले जाई. ते भारतीय राष्ट्रभक्ती म्हणून काँग्रेसला वर्गणी रूपाने मदत करीत. साहजिकच काँग्रेसने आपल्या देशबांधवावरील अन्याय दूर करण्याकडे लक्ष दिले. अधिवेशनात तसे ठराव पास केले.

Scanned by CamScanner

GoodLuck Page No.
Date

## ६) भारतीयांनी प्रशासकीय पात्रता सिद्ध केली.

भारतीय लोक अज्ञानी असून त्यांना राज्यकारभार करता येणार नाही अशी इंग्रज लोकांची समजूत होती. त्यादृष्टीने ते भारतीयांकडे पाहत असत. पण काँग्रेसने आपल्या कामगिरीतून ती पात्रता सिद्ध केली. 1892 चा कायदा राबविताना काँग्रेसने दाखवून दिले कि त्यात उणीवा आहेत. प्रशासनातील भारतीयांचे प्रतिनिधित्व वाढवले पाहिजे, अधिकारात वाढ करा अशा प्रकारचे ठराव पास केले. पूर्ण अभ्यास करून लोकशाही पद्धतीने सरकारचे दोष दाखवून दिले. भारतीयांची पात्रता, कार्यक्षमता दाखवून दिली. काँग्रेसने केलेल्या राजकीय जागृतीची, ठरावांचा दखल घेऊन सरकारने 1892 चा कायदा पास करून काही राजकीय सुधारणा केल्या. ते एक काँग्रेसचे यशस्वी कार्य होते.

## काँग्रेसच्या कार्याचे मुल्यमापन

मवाळांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने 20 वर्षात वरीलप्रमाणे कार्य केले, त्याचे मुल्यमापन करताना त्यामध्ये गुण-दोष दाखविले जातात. त्यावर अनेकांनी कडक टीका केली. उदा. लाला लजपतराय म्हणतात, "वीस वर्षांच्या प्रयत्नानंतर काँग्रेसच्या हाती भाकरीऐवजी दगड आले. तसेच इंग्रजधार्जिणी, दिखाऊ राजभक्तीचा चैतन्यहीन तमाशा, स्वातंत्र्याऐवजी सवलती मागणारी टोळी. इ. प्रकारे टीका केली आहे. अशी टीका करण्यामागे जहालमतवादी गट होता.

अर्थात ही टीका सर्वस्वी योग्य नाही. कारण काँग्रेसची ही अगदी प्रारंभिक किंवा प्राथमिक अवस्था होती. तरीही तिने अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले. ठराव पास केले. अनेक सुधारणा मिळविल्या. जनतेत जागृती करून राष्ट्रवाद अधिक विकसित केला. त्याचा लाभ पुढील आक्रमक धोरण राबविण्यास झाला हे नाकारता येणार नाही. प्रारंभिक अवस्थेत स्वातंत्र्याची मागणी केली असती तर तो आत्मघात ठरला असता. सरकारने संघटना दडपून टाकली असती. ना. गोखले म्हणाले, कि तसं केले तर बलाढ्य सरकार पाच मिनिटांत तिला चिरडून टाकील. तेव्हा मवाळांनी स्वातंत्र्य मागितले नाही. पण भविष्यात तशी मागणी करण्यासाठी अनुकूलता निर्माण केली. म्हणून याबतीत डॉ. पट्टाभिसितारमय्यांचे मत योग्य वाटते. ते म्हणतात, मवाळांना आपण दोष देऊ नये. तेव्हाच्या

Scanned by CamScanner

परिस्थितीत त्यांची धोरणे बरोबर होती. अधिक जहाल मार्ग स्वीकारला असता तर सरकारने संघटनेवर बंदी घातली असती. उलट काँग्रेस टिकवून तिला राष्ट्रीय पक्षाचे रूप देण्यात मवाळ गटाचे नेतृत्व उपकारक ठरले.

unite-1

## B) ~~मवाळांचे~~ मवाळवाद्यांचे कार्य

राष्ट्रीय काँग्रेसच्या प्रारंभीच्या कालखंडामध्ये ज्या पुढाऱ्यांच्या हातात राष्ट्रीय सभेची सूत्रे होती त्या पुढाऱ्यांच्या विचार पध्दतीवरून त्या पुढाऱ्यांच्या गटाला मवाळांचा गट नेमस्त म्हणून संबोधले जात होते. सन 1885 ते 1905 या राष्ट्रीय सभेच्या कालखंडाशी नेमस्तांचा कालखंड म्हणून भारताच्या इतिहासामध्ये नोंद आहे. त्यांची विचार करण्याची पध्दती सरकारला कोणत्याही प्रकारे विरोध न करता कायद्याच्या चौकटीमध्ये राहून काम करून घेणे अशी होती. त्यामुळे त्यांनी आपल्या कार्यपध्दतीतून ब्रिटिश राजकर्त्यांवर प्रभाव पाडलेला नाही. या त्यांच्या कार्यपध्दतीविषयी न्या. रानडे म्हणतात की, राजकारण अगर राज्यकारभार करणे हे भारतीयांना नवीन आहे. ~~द~~ कोणत्याही प्रकारची अपेक्षा न करता दीर्घकाळ हे कार्य केले पाहिजे. सरकारला त्याची फक्त जाणीव करून द्यावी. परंतु प्रत्यक्षामध्ये लोकांना उद्देशुन त्याचे स्मरण करून दिले पाहिजे. "जनतेच्या मागण्या ब्रिटिश सरकारसमोर मांडणे व जनजागृती करणे हा उद्देश समोर ठेवून राष्ट्रीय सभेने कार्य केले. ते कार्य करताना मवाळांनी पुढील मार्गांचा अवलंब केला.

### 1) मवाळांचा रितसर / सनदशीर मार्ग :

सुरवातीच्या काळात राष्ट्रीय काँग्रेसचे नेतृत्व करणारे लोक म्हणजे दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, दिनशॉ वाच्छा, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, व्योमेशचंद्र बॅनर्जी हे होते. काँग्रेसचे आधारस्तंभ उच्च विद्याविभूषित नेते होते. त्यांच्या मार्गदर्शनांनी जनतेच्या मागण्या अत्यंत विनम्र व सौम्य मार्गांनी, सरकारकडे विनंती अर्जाच्या रूपांनी मांडून त्या मान्य करून घेणे हा होता. कारण या लोकांचा सरकारच्या कायावर, न्यायबुद्धीवर अधिक विश्वास होता. या मार्गाचा अवलंब करून राजकिय विकास व विकासाबरोबर जनजागृती करून समाज संघटन करावयाचे हे धोरण त्यांनी ठरवलेले होते.

Scanned by CamScanner

GoodLuck Page No.
Date

3) लेखी अर्ज/विनंती मार्गांचा अवलंब:

भारतातील लोकांमध्ये जागृती करावयाची तर शिक्षणाच्या माध्यमाचा वापर करून रूसो, मॉन्टेस्क्यू, मिल, स्पेन्सर या परकीय तत्ववेत्यांच्या तत्वज्ञानातून जगजागृती करावयाची व राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनामध्ये भारतापुढील महत्वाच्या प्रश्नांवर चर्चा करून ठराव पास केला करून घेण्यासाठी सनदशीर मार्गांचा अवलंब करून त्यांचा पाठपुरावा करत राहणे व राष्ट्रीय सभेने कोणते कार्य केले ते जनतेच्या समोर मांडत राहणे व राष्ट्रीय सभेने कोणते कार्य केले ते जनतेच्या समोर मांडत राहणे हे होते. कारण या मवाळ नेत्यांना असे वाटत होते कि, ब्रिटिश सरकारला विरोध करून त्यांचा रोष ओढवून घेणे प्राप्त परिस्थितीत योग्य नाहि आणि ते परवडणारे नाही.

4) ब्रिटिशांच्या लोकशाही विचारसरणीचा आदर:

ब्रिटिश सरकारच्या लोकशाही धोरणावर मवाळ नेत्यांचा अत्यंत विश्वास होता. इंग्लंडमधील प्रशासन व्यवस्था हि लोकशाहिर आधारित आहे. त्यांची घटना हि लोकशाही तत्वांचे उगमस्थान आहे. आणि त्या प्रकारचे शासन ब्रिटिश लोक भारतातील लोकांना केव्हा ना केव्हा देण्याचा विचार करतील अशा प्रकारचा भाबडा विश्वास होता. भारतातून बाहेर जाऊन शिक्षण घेतलेल्या लोकांनी त्या देशातील अगदी जवळून पाहिलेली होती तशा प्रकारच्या लोकशाही शासन पद्धती भारतीय जनतेला उपभोगता येईल असा ठाम विश्वास वाटत होता.

5) ब्रिटिशांच्या सदसद्विवेक बुद्धीवर विश्वास.

मवाळ नेत्यांची ब्रिटिशांच्या विवेकबुद्धीवर श्रद्धा होती. भारतीयांमध्ये जनजागृती करताना राज्यकर्त्यांबाबत जनतेच्या मनात तिरस्कार निर्माण नाही याची काळजी घेतलेली आहे. कारण दादाभाई नौरोजींसारख्या मवाळ विचारसरणीच्या नेत्यांना इंग्रजांच्या साम्राज्यवादी धोरणाचे खरे स्वरूप माहित होते. तरीदेखील ब्रिटिश लोक भारतीयांना अन्यायी वागणूक देणार नाही असे त्यांचे मत होते.

6) क्रमवार सुधारणा:

राष्ट्रीय सभेने सुरुवातीपासूनच स्वयंशासनाची मागणी इंग्रजांकडे केलेली होती. ब्रिटिश कौन्सिलमध्ये भारतीय सदस्यांचा समावेश करावा. व त्यांच्या अधिकारांमध्ये वाढ करावी अशी त्यांची मागणी होती.

Scanned by CamScanner

अशाप्रकारे क्रमवार पद्धतीने राज्यकारभाराचे ज्ञान मिळून लोक परिपक्व झाल्यानंतर राजकीय सत्ता हातामध्ये द्यावी असे मवाळ नेत्यांना वाटत होते आणि तशा प्रकारे ब्रिटिश सरकार क्रमवार सुधारणा भारतीयांकडे सुपूर्द करतील याची खात्री होती.

6) ब्रिटिश शासन हे ईश्वरी वरदान!

इंग्रजांचे भारतावरील शासन हे ईश्वरी वरदान आहे. असे मवाळ नेत्यांचे मत होते. सुरेंद्रनाथ बॅनर्जी म्हणतात. की इंग्रजांचे भारतात असणे हे भारतातील विविध वर्गातील लोकांना एकत्रित करण्यासाठी आवश्यक आहे आणि देशहितासाठी ते एक वरदान आहे. त्याचबरोबर ना. गोखले यांच्या कडून वक्तव्यातून ते स्पष्ट होते कि, भारतात शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्याचे कार्य फक्त इंग्रज लोकच करू शकतात. आपले सामाजिक व आर्थिक जीवन हे इंग्रजांच्या निर्णयावर अवलंबून आहे अशा प्रकारची श्रद्धा सामाजिक इंग्रजांच्या राजवटीबद्दल बाळगणारे मवाळ नेते होते.

मवाळ नेत्यांनी वरील मार्गांचा अवलंब करून भारतीयांना आवश्यक असणाऱ्या सामाजिक सुधारणा, राजकारणातील सहभाग, स्वयंशासन इत्यादी मागण्या सरकारदरबारी मांडून त्यांचा सतत पाठपुरावा केल्यानंतर त्या मान्य होतील असे मवाळ नेत्यांना वाटत होते.

- मवाळ नेत्यांनी सरकारकडे केलेल्या मागण्या

राष्ट्रीय सभेच्या स्थापनेनंतर २० वर्षांच्या कालखंडामध्ये जे कार्य केले त्या कार्याचा भारतातील जनतेला कोणकोणत्या क्षेत्रात सोई व सवलतींचा फायदा मिळाला पाहिजे हा उद्देश ठेवून मवाळांनी केलेल्या मागण्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1) आर्थिक विकास / शेती सुधारणा:

मवाळांनी राष्ट्रीय सभेपुढे मागण्या मांडत असताना भारत हा शेतीप्रधान देश आहे. जर देशाचा आर्थिक विकास साधवयाचा असेल तर सरकारने शेती सुधारणेकडे आपले लक्ष केंद्रित करावे व त्यासाठी शेतकऱ्यांना कमी व्याजदराने कर्जपुरवठा करावा, शेतसारा कमी आकारावा. शेतीतील उत्पन्नाची वाढ होण्यासाठी शेतीला पाणीपुरवठ्याची सोय करावी अशा प्रकारच्या आर्थिक विकासाच्या मागण्या केल्या.

Scanned by CamScanner

GoodLuck Page No.
Date

२) सर्वसामान्यांवरील करआकारणी :

सर्वसामान्य जनतेवर करआकारणी गरीब लोकांना तो भारत भरताना जड होणार नाही याकडे लक्ष पुरवावे अशी प्रामुख्याने मागणी केली. त्याचबरोबर जीवनावश्यक व दररोजच्या वापरात असणाऱ्या मिठावरील कर सरकारने रद्द करावा अशा प्रकारच्या मागण्या सरकारपुढे मांडल्या.

३) गृहोद्योग व व्यवसाय :

भारतातील गृहउद्योग व हस्तकला यासारखे व्यवसाय इंग्रजीशासनाच्या आर्थिक धोरणामुळे नष्ट पावत आहेत असा आक्षेप मवाळ नेत्यांनी घेतलेला होता. या लोप पावत जाणाऱ्या गृहोद्योगांना व हस्तकला व्यवसायाला संरक्षण मिळाले पाहिजे, अशा प्रकारे धोरण इंग्रजांनी आखावे. त्याचबरोबर भारतातील संपत्तीचा ओघ इंग्लंडकडे वळलेला आहे.

४) प्रशासनामध्ये सुधारणा :

इंग्रज सरकार भारतामध्ये करीत असलेला राज्यकारभार हा भ्रष्टाचार व वशीलेबाजीने पोखरला आहे. त्यामध्ये सुधारणा कराव्यात. त्याचबरोबर प्रशासनातील वरिष्ठ पदावर भारतीयांची नेमणूक करावी. आपल्या देशातील लोकांना प्रशासनामध्ये सामावून घेऊन त्यांच्या अधिक पगाराचा भार सहन करावा. भारताच्या प्रशासनात परकीय लोक आहेत. ते भारतीयांच्या समस्या जाणून घेताना दिसत नाहीत. त्यामुळे त्यांच्या जागेवर भारतीयांनी नियुक्त करावे.

५) कायदा व न्यायमंडळ :

सन १८६१ च्या कायद्याप्रमाणे प्रांतीय कायदेमंडळांचे स्वरूप विस्तारित असावे. त्याचबरोबर त्यामधील सदस्यांची निवड करताना मतदान पद्धतीचा वापर करावा. लोकशाहीचे स्वरूप भारतामधील प्रशासनामध्ये यावे अशी मागणी केली होती. याचबरोबर सरकारी सदस्यांची संख्या कायदेमंडळात अधिक होती ती कमी करून बिगर-सरकारी संख्या वाढवावी. तसेच भारतीय सदस्यांना ठराव मांडण्याचा व प्रश्न विचारण्याचा अधिकार मिळावा अशा प्रशासनासंबंधी महत्त्वाच्या मागण्या मवाळ नेत्यांनी केलेल्या होत्या.

न्यायसंस्था ही स्वतंत्र संस्था असावी. तिचा संबंध कार्यकारी मंडळाशी आजिबात असू नये. त्याचबरोबर सरकारने शिक्षणावर अधिक खर्च करावा व शस्त्रबंदी कायदा रद्द करावा. भारतीयांना आदराची व सन्मानाची वागणूक मिळाली.

Scanned by CamScanner

## मवाळ नेत्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन / परिणाम

मवाळ नेत्यांनी केलेल्या कार्याचे परीक्षण केले असता असे दिसून येते त्यांनी केलेले सर्वच कार्य निरर्थक होते असे आपल्याला म्हणता येणार नाही. उलट त्यांनी केलेल्या कार्यातून जनजागृतीबरोबर त्यांनी राष्ट्राभिमान व संघटित शक्ती उभी केली असेच म्हणावे लागेल त्याचबरोबर त्यांनी जागृत केलेल्या राष्ट्राभिमानातून स्वातंत्र्याचा मार्ग सापडला. कारण सन 1857 चा उठाव अयशस्वी झाला. त्या पार्श्वभूमीवर परत मवाळ नेत्यांनी आपल्या कार्यातून ब्रिटिश साम्राज्याचे खरे रूप कोणते आहे याचा उलगडा केला. मवाळांनी केलेल्या कार्यसंदर्भात ना. गोखले म्हणतात की, आम्हाला जरी सर्वच ठिकाणी अपयश आले तरी या अपयशाच्या पायावरच आम्हाला स्वातंत्र्याची चळवळ चालविण्याची खरी शक्ती प्राप्त होणार आहे. हे विसरू नका. "जात-पात, रंग, हुद्दा व वंश इत्यादी विसरून एकाच व्यासपीठावर काम करण्याची स्फूर्ती कोणी दिली असेल तर ती मवाळ नेत्यांनी दिली असे म्हणावे लागेल.